# 'महाराष्ट्र तुमच्यासोबत'; ठाण्यात उद्धव ठाकरे यांच्या समर्थनार्थ पहिला बॅनर




ePaper

| वर्ष - 6 । अंक - 81 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com । रविवार । दिनांक 26 जून 2022 । पिंपरी-चिंचवड आवृत्ती । mahaenews.com । maha_enews । Mahaenews


## आतील पानांत


- पुण्यात तानाजी सावंत यांच्या कार्यालयाची तोडफोड
- नागरिकांनी ३० जून पर्यंत मालमत्ता कर सवलतीचा लाभ घ्यावा
- कार्यकारिणी बैठकीत 'हा' महत्त्वाचा ठराव एकमताने मंजूर




विश्वासदर्शक ठराव होणार आहेत. मुंबईत ज्यावेळी येतील त्यावेळी विमानतळावरुन विधानभवनात जाण्याचे रस्ते वरळीतून आहे, वरळीतून नाही तर परळ मधून रस्ते आहेत. भायखळ्यातून रस्ता आहे. ही मुंबई हा महाराष्ट्र आपल्याला दुसऱ्याच्या हातात जाऊ द्यायचं नाही, असं आदित्य ठाकरे म्हणाले. केंद्र सरकार फ्लोअर टेस्टला आर्मी लावेल, पॅरामिलिटरी फोर्स लावेल, केंद्र सरकारला जगाला, देशाला आणि राज्याला उत्तर द्यावं लागेल. **- आदित्य ठाकरे**, पर्यावरण मंत्री

भगवे आमचे रक्त तळपते, तप्त हिंदवी बाणा... जात, गोत्र अन धर्म अमुचा शिवसेना, शिवसेना, शिवसेना...! त्यामुळे शिवसैनिक होतो, आहे आणि राहणारच... पण गेली अडीच वर्षे आपल्या संघटनेची 'राष्ट्रवादी' गळचेपी चालली आहे. त्याचा निषेध म्हणून आपण जिल्हाप्रमुखपदाचा राजीनामा देत आहोत.' ठाणे महानगरपालिकेतील सर्व ६७ माजी नगरसेवक पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबतच आहेत.

**- नरेश म्हस्के, ठाणे**



## शॉर्ट न्यूज »

### वडिलांनीच केला तरूण मुलाचा खून...

**पिंपरी ।** संपूर्ण कुटुंबाला सतत त्रास देतो आणि वेळप्रसंगी मारहाणही करतो, म्हणून वडिलांनीच तरूण मुलाचा खून केल्याची घटना मोशी येथे उघडकीस आली आहे. युवराज अशोक सावले (वय-२२, रा. जुन्या जकात नाक्याजवळ, मोशी) असे मयत तरूणाचे नाव आहे. याप्रकरणी त्याचे वडील अशोक शिवाजीराव सावले (वय-४९, रा. मोशी) यांना पोलिसांनी अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ जूनला पहाटे तीनच्या सुमारास युवराजच्या डोळ्यात सर्वप्रथम मिरची पूड टाकण्यात आली. त्यानंतर, धारदार शस्त्राने तसेच लोखंडी पाईपने डोक्यात घाव घालून त्याचा खून करण्यात आला.


पवना धरणात 19 टक्केच पाणीसाठा

# अरेरे ! पिंपरी चिंचवडकरांवर पाणीकपातीचे संकट!

## पावसाचा अंदाज घेऊनच पाणी कपातीचा निर्णय घेतला जाणार...

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**

पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणात केवळ १९ टक्के इतकाच पाणीसाठा शिल्लक आहे. यंदा जून महिना संपत आलातरी समाधानकारक पाऊस झालेला नाही. पावसाने ओढ दिल्यास शहरावर पाणी कपातीचे संकट ओढवू शकते. दरम्यान शुक्रवारपासून रिमझिम पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे सद्य:स्थितीतील पाणीसाठ्याचा



आढावा घेऊनच कपातीसंदर्भात निर्णय घेतला जाईल, असे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. पवना धरणात ३६ दिवस पुरेल एवढे पाणी आहे. त्यामुळे पाऊस लांबल्यास शहरवासीयांवर पाणी कपातीची टांगती तलवार आहे.

पिंपरी-चिंचवड औद्योगिकनगरीस मावळातील पवना धरणातून १०० टक्के पाणीपुरवठा केला जातो. धरणातून नदीत आणि रावेत येथील जलउपसा केंद्रातून प्राधिकरणातील जलशुद्धिकरण केंद्रात पाणी आणले जाते. तेथून शहरात उभारण्यात आलेल्या टाक्यांमध्ये पाणी सोडले जाते. तेथून जलवाहिन्याच्या माध्यमातून शहरातील विविध भागात पाणीपुरवठा केला जातो. शहरात सध्या ५४० एमएलडी पाणीपुरवठा होता. हे पाणी शहरातील अर्ध्या भागात एक दिवस आणि उर्वरित भागात दुसऱ्या दिवशी पुरविले जाते. पाणी उपसा करण्याची यंत्रणा सक्षम नसल्याने दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे.

### यंदा केवळ 24 मिमी पाऊस

गेल्या वर्षी पवना धरण परिसरात आजअखेरपर्यंत ४८० मिमी पाऊस पडला होता. मात्र, यावर्षी केवळ २४ मिमी पाऊस पडला आहे. त्यामुळे पाऊसच कमी असल्याने किंवा पाऊस लांबल्यास पाणी कपातीचे संकट शहरावर येऊ शकते.

# गृहनिर्माण संस्थांमध्ये आमदार निधीतून पायाभूत सुविधा उभारण्यास सरकारची मंजुरी

## आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पाठपुराव्याला यश

**। पिंपरी-चिंचवड ।**

राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील खासगी जागेवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आमदार निधीचा वापर करण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे. अशी परवानगी मिळावी यासाठी चिंचवड मतदारसंघाचे भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांनी राज्य सरकारकडे आणि विधानसभेत सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर सरकारने ही परवानगी दिल्यामुळे आमदार जगताप यांच्या पाठपुराव्याला





यश आले असून, आता सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी आमदार निधीतून एकूण ९ प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध होतील. आमदारांना मिळणारा स्थानिक विकास निधी कोणत्या कामांसाठी वापरायचा, त्याची मार्गदर्शक तत्वे ठरलेली आहेत. त्यानुसार खासगी जागेवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना पायाभूत व अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आमदार निधीतून खर्च करण्याची तरतूद नव्हती. परंतु गृहनिर्माण संस्थांना काही सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या निधीतून खर्च करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी आमदार लक्ष्मण जगताप यांनी राज्य सरकारकडे केली होती. त्याबाबत त्यांनी सरकारचे संबंधित मंत्री आणि विभागाकडे वारंवार पाठपुरावा केला होता. तसेच विधानसभेच्या सभागृहात अनेकवेळा प्रश्नही उपस्थित केले होते.

त्यानंतर राज्य सरकारने आमदार निधीच्या खर्चाबाबत असलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्याचे ठरविले. महानरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती क्षेत्रातील तसेच या नागरी क्षेत्रांना लागून असलेल्या ग्रामीण परिसरातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या खासगी जागेवर निवडक पायाभूत वा अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत निधी खर्च करण्यास परवानगी देण्याबाबत सरकार पातळीवर विचार सुरू झाला. आमदार निधी खर्च करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये कोणकोणत्या सुधारणा वा बदल करणे संयुक्तिक राहील, याचा अभ्यास करण्यासाठी नियोजन विभागाची एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने दिलेल्या अहवालानंतर मंत्रिमंडळ उपसमितीने आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांसाठी सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. त्यानुसार खासगी जागेवरील सहकारी गृहनिर्माण सस्थांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आमदार निधीचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्याबाबत राज्याच्या नियोजन विभागाने २२ जून २०२२ रोजी आदेश जारी केला आहे. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पायाभूत सुविधांवर आमदार निधी खर्च करण्यास परवानगी मिळावी म्हणून आ. लक्ष्मण जगताप यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

## शॉर्ट न्यूज »

### खराडी भागात दोन गटात हाणामारी; दोघांवर शस्त्राने वार

। पुणे । महाईन्यूज ।

नगर रस्त्यावरील खराडी भागात वैमनस्यातून दोन गटात हाणामारी झाल्याची घटना घडली. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली. परस्परविरोधी तक्रारीनुसार दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सुहास गवळी (वय २९, येरवडा) याने या संदर्भात चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी आरबाज जैनुद्दीन नदाफ (वय २५), हैदर मोहम्मद नदाफ (वय ५२, दोघे रा. आपले घर सोसायटी, खराडी) यांना अटक करण्यात आली. सुहास गवळी यांचा भाऊ रोहित (वय ३२) याचा आरोपी नदाफ आणि साथीदारांशी वाद झाला होता. या कारणावरुन नदाफ आणि साथीदारांनी रोहित यांच्यावर कोयत्याने वार केले. या घटनेत रोहित जखमी झाला असून पोलीस उपनिरीक्षक अरविंद कुमरे तपास करत आहेत. दरम्यान, सुलतान नदाफ (वय २५, रा. खराडी) याने परस्पर विरोधी फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार तिघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नदाफ आणि त्याचा चुलत भाऊ खराडी भागातील एका उपहारगृहात चहा प्यायला गेले होते.

## बंडखोर आमदारांविरोधात शिवसैनिक आक्रमक

# पुण्यात तानाजी सावंत यांच्या कार्यालयाची तोडफोड


### क्रांती ठोक मोर्चाचे आमदार तानाजी सावंतांना समर्थन; कार्यालयात तोडफोड झालेल्या ठिकाणी वाहिली फुले

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर महाराष्ट्रातील राजकारण चांगलेच तापले आहे. शिवसेनेच्या ३५ पेक्षा जास्त आमदारांनी एकनाथ शिंदेंना समर्थन दिले आहे. त्यामुळे शिंदें विरुद्ध उद्धव ठाकरे अशी स्थिती सध्या पहायला मिळत आहे. बंडामुळे आता शिवसेनेचे कार्यकर्तेही एकनाथ शिंदेवर नाराज झाले आहेत. आक्रमक झालेल्या शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी सेनेचे बंडखोर आमदार तानाजी सावंत यांच्या पुण्यातील कार्यालयाची तोडफोड केली आहे.



शिवसेनेचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी मागील पाच दिवसांपासून शिवसेनेविरुद्ध बंड पुकारले आहे. यामुळे राज्यातील सत्तासंघर्ष शिगेला पोहचल्याचे दिसत आहे. शिंदे यांनी आपल्यासोबत ४० पेक्षा अधिक आमदार असल्याचा दावा केला असून, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडी सरकारमधून बाहेर पडावे अशी मागणी केलेली आहे. यामुळे शिवसैनिकांनी एकनाथ शिंदे आणि बंडखोर आमदारांविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. आज शिवसेनेचे बंडखोर आमदार तानाजी सावंत यांचे पुण्यातील बालाजीनगर येथील मे. भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेडचे कार्यालय शिवसेनेचे माजी नगरसेवक विशाल धनवडे यांच्यासह कार्यकर्त्यांनी फोडले. या घटनेनंतर मराठा क्रांती ठोक मोर्चातील कार्यकर्त्यांनी तानाजी सावंत यांना समर्थन देत, या हल्ल्याचा निषेध नोंदवला.



### शिवसेनेच्या कार्यकर्त्यांकडून बंडखोर आमदारांना इशारा

पुण्यातील बालाजीनगर येथे शिवसेनेचे आमदार तानाजी सावंत यांचे मे. भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेडचे कार्यालय आहे. तानाजी सावंत यांनी एकनाथ शिंदेंना पाठिंबा देत बंडखोर आमदारांच्या गटात सामील झाले आहेत. त्यामुळे आक्रमक झालेल्या शिवसैनिकांनी सावंत यांच्या कार्यालयाची तोडफोड करत राडा घातला. "ज्या आमदारांनी बंड केले आहे. ते शिवसेनेमुळे मोठे झाले आहे. त्या सर्वांनी हे विसरता कामा नये. जे आमदार तिकडे गेले आहेत त्या सर्वांनी पुन्हा यावे, अन्यथा आज तानाजी सावंत यांच्या ऑफिसची अवस्था झाली आहे. तशी राज्यातील अनेक बंडखोर आमदारांची होईल", असा इशारा शिवसेनेचे माजी नगरसेवक विशाल धनवडे यांनी दिला आहे.

### शिवसेनेकडून बंडखोरांना नोटीस

शिवसेना नेते एकनाथ शिंदेंसोबत बंड करणाऱ्या १६ आमदारांना अपात्र ठरवण्यात यावे, अशी मागणी शिवसेनेने विधानसभा उपाध्यक्षांकडे केली आहे. ४८ तासांच्या आता या आमदरांना आपले भूमिका मांडण्यास सांगितले आहे. जर आमदारांनी या वेळेत आपली भूमिका मांडली नाही, तर त्यांना अपात्र ठरवण्यात येईल, अशी माहिती शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी दिली.

मराठा क्रांती ठोक मोर्चातील कार्यकर्त्यांनी तानाजी सावंत यांना समर्थन दिले आहे. मराठा क्रांती ठोक मोर्चाने शिवसेनेचे बंडखोर आमदार तानाजी सावंत यांना पाठिंबा दर्शवला आहे. शिवाय, आज शिवसैनिकांकडून तानजी सावंत यांच्या कार्यालयाची तोडफोड करण्यात आल्यानंतर, मराठा क्रांती ठोक मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी त्या ठिकाणी जाऊन फुले देखील वाहिली आहेत.

### आम्ही देखील जशास तसे उत्तर देण्यास समर्थ

यावेळी मराठा क्रांती ठोक मोर्चा समन्वयक महेश डोंगरे म्हणाले की, "तानाजी सावंत यांच्या साखर कारखान्याच्या ऑफिसवर आज जो भ्याड हल्ला झाला. त्या घटनेचा आम्ही सर्वजण निषेध व्यक्त करतो. एवढी घटना होऊन देखील तानाजी सावंत यांनी शांततेत राहण्याच आवाहन केले आहे. पण येणाऱ्या काळात तुम्ही तारीख, वार आणि वेळ सांगा, आम्ही देखील जशाच तसे उत्तर देण्यास समर्थ आहोत." असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.

# संत सोपानदेवांच्या पालखीचे सासवडहून प्रस्थान

### टाळ मृदंगाच्या तालावर ज्ञानोबा माउली तुकाराम, संत सोपान देवांचा जयघोष

पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

संत ज्ञानेश्वर माउलींचे धाकटे बंधू संत सोपानदेव यांच्या पालखीने शनिवारी (२५ जून) आषाढी वारीसाठी प्रस्थान ठेवले. दुपारी दीड वाजता सासवड येथील संत सोपानदेवांच्या समाधी मंदिराजवळ हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत फुलांनी सजवलेल्या पालखीमध्ये पादुका ठेवल्यानंतर सोहळ्याने पंढरपूरकडे जाण्यासाठी प्रस्थान ठेवले. वैकुंठीचे सुख नलगे पै चित्ती। हरी हेची मुर्ती विठ्ठल ध्यावो ॥




याचेने स्मरणे कैवल्य साचार। सोपान विचार हरि जपे ॥ टाळ मृदंगाच्या तालावर ज्ञानोबा माउली तुकाराम व संत सोपान देवांचा जयघोष करीत वारकरी आनंदाने नाचू लागले. या वेळी आमदार संजय जगताप, प्रांताधिकारी प्रमोद गायकवाड, तहसीलदार रूपाली सरनोबत, गटविकास अधिकारी अमर माने, सासवडचे मुख्याधिकारी निखील मोरे आदी उपस्थित होते.

आज पहाटे चार वाजता मंदिरात समाधीची काकडआरती, पवमान अभिषेक, महापूजा आदी कार्यक्रम झाल्यानंतर वारकऱ्यांची दर्शनासाठी मोठी रांग लागली.

### पालखीच्या पुढे व मागे मानाच्या दिंड्या

पालखी सासवड नगरीतून खांद्यावर नेऊन जेजुरी नाक्यावर फुलांनी सजविलेल्या रथामध्ये ठेवण्यात आली व सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ झाला. पालखी सोहळ्यामध्ये राज्याच्या विविध भागातील ९७ मानाच्या दिंड्या आहेत, अशी माहिती पालखी सोहळा प्रमुख ॲड.त्रिगुणमहाराज गोसावी यांनी दिली. पालखी सोहळ्याचा शनिवारी पांगारे येथे मुक्काम आहे. तसेच श्री संत योगीराज चांगा वटेश्वर महाराज पालखी सोहळ्याचेही सासवडमधून दुपारी दीड वाजता प्रस्थान झाले .पालखीच्या पुढे व मागे मानाच्या दिंड्या आहेत. पारगाव मेमाणे, यवत,इंदापूरमार्गे सोहळा पंढरपूरला पोचणार आहे.

## शॉर्ट न्यूज

**देहूरोडच्या कचऱ्याच्या धुरामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात**

**।पिंपरी ।**

देहुरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा कचरा पुनागेट समोरील कचरा डेपोत आणून टाकला जातो. या कच-यास वारंवार आग लागते, या आगीमुळे त्याच्या धुराचा उग्र वासाचा त्रास निगडी परिसरातील रहिवाशांना होऊ लागला आहे. यामुळे रूपीनगर, तळवडे, से. 22, निगडी गावठाण,साईनाथनगर व यमुनानगरच्या नागरिकांचे आरोग्य धोकयात आले आहे. त्यामुळे हा कचऱ्याचा प्रश्न तात्काळ सोडवण्यात यावा, अशी मागणी रुपीनगर नागरी कृती समितीने केली आहे. याबाबत रुपीनगर नागरी कृती समितीने महापालिका आयुक्तांची भेट घेतली. यावेळी आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देहुरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा निगडीतील रूपीनगर जवळील मोकळ्या माळरानावर कचरा डेपो आहे. याठिकाणी देहूरोड परिसरासह निगडी भागातील काही हॉटेलचा ओला कचराही टाकला जातो.

### महापालिकेच्या वतीने महिलांना सामान्य करामध्ये 50 टक्के सवलत

# नागरिकांनी 30 जून पर्यंत मालमत्ता कर सवलतीचा लाभ घ्यावा!

### सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांचे आवाहन

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**






पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत विविध मालमत्तांना वेगवेगळ्या सवलती जाहिर करण्यात आलेल्या आहेत. यापैकी कुठल्याही सवलतीचा लाभ घ्यावयाचा असेल तर ३० जून पुर्वी आपल्या संपुर्ण मालमत्ता कराचा भरणा करून नागरिकांनी सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन मालमत्ता कर आकारणी विभागाचे सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांनी केले आहे.

महापालिकेच्या वतीने महिलांना सामान्य करामध्ये ५० टक्के सवलत, दिव्यांगांना सामान्य करातध्ये ५० टक्के सुट, माजी सैनिकांना मालमत्ता करात संपुर्ण सवलत तसेच ऑनलाईन पेमेंट केल्यास ५ टक्के सवलत देण्यात येते. ३० जून पूर्वी आगाऊ भरणा करणाऱ्या नागरिकांना सामान्य करात १० टक्के सुट देण्यात येते. तसेच पर्यावरण पुरक इमारतींना व पर्यावरण पुरक निवासी मालमत्तांनी पर्यावरण पुरक उपक्रम राबविल्यास त्यांना सुट मिळते. यामध्ये, पर्यावरण पुरक मालमत्तांना १० टक्के, आगाऊ भरणासाठी १० टक्के तसेच ऑनलाईन भरण्यासाठी ५ टक्के असे एकुण २५ टक्कांपर्यंत सवलत दिली जाते.

सवलत घेण्याची शेवटची तारिख ३० जून २०२२ असून सर्व नागरिकांनी मालमत्ता कर सवलतीचा लाभ घेणे आवश्यक आहे. गतवर्षी ज्या नागरिकांचे धनादेश अनादर झालेले आहेत. त्यापैकी अनेक लोकांने मनपाकडे भरणा केलेला आहे. मात्र ज्या लोकांनी अद्याप पर्यंत भरणा केलेला नाही. अशा नागरिकांनी नियम १३८ अन्वये म्हणजे ज्यामध्ये फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल होतो. या नियम १३८ अन्वये नोटीस पाठविलेली आहे. ज्यांचे उत्तर मिळालेले नाही त्यांच्यावर फौजदारी गुन्हाची दाखल करणेची कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर गेल्यावर्षी ज्या मालमत्तांना जप्ती पूर्व नोटीसा दिलेल्या होत्या. त्यामधील ज्या लोकांनी अद्याप पर्यंत कराचा भरणा केलेला नाही. अशा मालमत्तांची १ जुलै २०२२ पासुन जप्तीची कार्यवाही सुरु करणार असुन त्यामध्ये जप्ती कार्यवाही कामी महाराष्ट्र सेकुरीटी फोर्स व क्षेत्रीय कार्यालयाकडील संपुर्ण टीम अशा प्रकारे कार्यवाही करण्यात येणार आहे. अशी अप्रिय कार्यवाही टाळण्यासाठी नागरिकांनी कराचा भरणा करणे आवश्यक आहे.

**प्रामाणिकपणे कर भरणाऱ्यांना सवलत योजना**

याचबरोबर अशा स्वरुपाची कार्यवाही करत असताना काही दंडनिहाय कार्यवाही असल्यास त्याचाही विचार मालमत्ता कर विभागामार्फत करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाने जे नागरिक प्रामाणिकपणे मालमत्ता करा भरणा करित आहेत. त्यांना सवलत योजना व जे नागरिक कराचा भरणा करीत नाही त्यांच्यासाठी जप्तीची कार्यवाही असे दुहेरी कार्यवाही करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांना शालेय जिवनापासूनच पर्यावरण संवर्धन व जनजागृतीचे धडे द्यावेत

### पिंपरी चिंचवड महापालिका तथा प्रशासक राजेश पाटील यांचे आवाहन

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच पर्यावरण पुरक राहणीमानाबददल जागरुक करणे गरजेचे असून प्लास्टीक मुक्ती, वसुंधरेच्या रक्षणाबाबत जनजागृतीपर धडे देवून पर्यावरण संवर्धन मोहिमेत सहभागी करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिका तथा प्रशासक राजेश पाटील यांनी केले. पिंपरी चिंचवड महापालिका, स्मार्ट सिटी व मुख्याध्यापक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने निगडी प्राधिकरण येथील किर्ती विद्यालयात शनिवार, दि. २५ रोजी सकाळी आयुक्त राजेश पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, अ क्षेत्रिय अधिकारी शीतल वाकडे, कार्यकारी अभियंता खरात, पिंपरी चिंचवड माध्य व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षा प्राचार्या साधना दातीर, किर्ती विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक जाधव, वसंतदादा हायस्कूलच्या प्राचार्या नेहा पवार, मुख्य लिपीक वैशाली सानप यांच्यासह मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी व शिक्षक, विद्यार्थी, मनपा अधिकारी- कर्मचारी, स्मार्ट सारथी टीम मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महापालिकेने शुन्य कचरा व्यवस्थापन मोहिम हाती घेतली आहे. शाळांनी देखील आपल्या परिसरात झाडांचा पालापाचोळा, कच-याचे व्यवस्थापन करावे. कच-याचे कंम्पोस्टींग, गांडूळ खत तयार करून बागकामासाठी वापर कसा करता येईल, याबाबत विद्यार्थ्यांना माहिती द्यावी. पर्यावरणाचा – हास कसा थांबविता येईल, याबाबत संदेश देवून त्यांना जागृत करावे. त्याचबरोबर, आपल्या मनातील सुंदर शहर प्रत्यक्षात उतरविण्यासाठी दि. २४ ते ३० जून या कालावधीत होत असलेल्या ऑनलाईन निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, फोटोग्राफी व प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थी व नागरिकांनी सहभागी व्हावे, असेही त्यांनी सांगितले. तत्पूर्वी, ढोल ताशा, लेझीमच्या गजरात शाळेच्यावतीने आयुक्त यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. तसेच, छत्रपती शिवाजी महाराज व सरस्वती मूर्ती पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली.भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयामार्फत स्मार्ट सिटी मिशनचा ७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात येत आहे. २५ जून २०२२ रोजी स्मार्ट सिटी मिशनला ७ वर्षे पुर्ण होत आहेत. या कालावधीत व हरित शहर, नव्याने विकसीत झालेले प्रकल्प, नवकल्पना, तंत्रज्ञानाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी केंद्र सरकारच्या "सबका भारत, निखरता भारत" या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रम पिंपरी चिंचवड महापालिका व स्मार्ट सिटीच्या वतीने दि. २५ ते २७ जून २०२२ या कालावधीत राबविण्यात येत आहे. यामध्ये विद्यार्थी, नागरिक, शैक्षणिक, सामाजिक संघटना यांना मोठया संख्येने सहभागी करण्यात आले आहे. शहरातील २५० हून अधिक मनपा व खाजगी शाळांनी एकाच दिवशी आपल्या शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धन मोहिमेत सहभाग नोंदविला आहे.

पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी मार्फत उभारण्यात आलेले आयसीसीसीला विद्यार्थ्यांच्या भेटींचे आयोजन, स्मार्ट सिटी प्रकल्प पाहणी दौरा, तज्ञ आणि मीडियासाठी क्युरेटेड ट्रिपची योजना, मिशन प्रवासाचे चित्रांकन, हवामान जागरूकता मोहीम, लोकांची मते, सार्वजनिक जागा सुधारणे, तरुण उद्योजकांसाठी तंत्रज्ञानावर आधारित 'आयडियाथॉन' आणि नागरी उपायांची अंमलबजावणी, शाळांमध्ये प्रश्नमंजुषा, सार्वजनिक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम, रेडिओ शो, कौशल्य विकास केंद्र स्टार्टअपमध्ये नवोपक्रम मेळावे, हरित शहर, नागरिकांना स्मार्ट सिटी प्रकल्पांजवळ देशी वृक्ष लावण्यासाठी जागृत करणे, शहरी शेतीवरील कार्यशाळा, थंड आणि ऊर्जा कार्यक्षम इमारत बांधकाम पद्धती, स्मार्ट सिटी फेअर – कौशल्य विकास केंद्रातील उत्पादनांचे प्रदर्शन, जलद, कमी किमतीत प्लेसमेकिंग / स्थानिक परिवर्तन आदी उपक्रम घेण्यात येत आहेत.

## संपादकीय »

# फुटीर गट बॅकफूटवर!!!

***फुटीर गटाची आजची भाषा एकदम मवाळ झालेली वाटली. "आम्ही अजून शिवसेनेत आहोत. आमची आमच्या नेत्यांविरोधात नाराजी नाही. आम्ही उद्धवसाहेबांचा आदर करतो. आदित्य ठाकरे काय, संजय राऊत काय, सगळ्यांबद्दल आमच्या मनात प्रेम आहे.***

मराठी माणसाच्या मनात शिवसेना आहे. उद्धव साहेबांचा महाराष्ट्रात एक दर्जा आहे..." फुटीर गटाची गेल्या 3-4 दिवसांतील आक्रमक भाषा जाऊन आता एकदम मवाळ आणि पालटलेला सूर आजच्या पत्रकारपरिषदेत दिसला.

फुटीर गटापुढे आता कुठलाही, त्यांना हवा किंवा अपेक्षित तसा ठोस पर्याय उरलेला नाही. तमाम कायदेतज्ञ, विधिमंडळात अनेक वर्षे काम केलेले ज्येष्ठ, निवृत्त अधिकारी सांगताहेत, त्यानुसार फुटीर गटासमोर फक्त विलिनीकरण हाच पर्याय आहे - भाजपामध्ये जा, नाहीतर प्रहारमध्ये विलीन व्हा! स्वतंत्र गट होणार, खरी शिवसेना आम्हीच वैगेरे वैगेरे स्वप्न धुळीस मिळाली आहेत. फुटिरांवर कारवाई होण्यापूर्वी म्हणणे मांडण्यास सात दिवसांची मदत मिळावी, ही अपक्ष आमदारांमार्फत पत्राद्वारे केलेली मागणी अयोग्य आणि बेकायदेशीर ठरली आहे. स्वतंत्र गट म्हणून मान्यता नसल्याने फुटिरांच्या सर्व हालचाली आणि दावे हे निरर्थक, फोल ठरत आहेत. त्यातच राज्यपाल राजभवनात नाहीत. विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांना अध्यक्ष नसतांना घटनेने अमर्यादित अधिकार बहाल केल्याची जाणीव आता फुटीरांना झालेली दिसतेय. त्यांच्या बंडाचा टिकाव लागतो की नाही, पदे राहतात की नाही, याची धास्ती जाणवायला लागली दिसत आहे. अपात्रातेच्या कारवाईची टांगती तलवार आहे. अपात्रतेचा फटकन निर्णय घेतला गेला तर तो घटनात्मक बरोबर की चूक, वैध की अवैध, अधिकार आहे की नाही ... वांझोट्या चर्चांना अर्थ नाही; पण पुन्हा पद मिळवायला कोर्टात जाऊन लढत बसावे लागेल. अपात्रता झाली तर भविष्यात आमदारकीचे कुठलेही लाभ मिळत नसतात, हे फुटीर आमदार चांगलेच जाणून आहेत. या सर्व अस्वस्थ आणि धीर सुटलेल्या आमदारांचा पडद्याआडून सारा दबाव फुटीर नेत्यावर नक्कीच असेल. त्यामुळे बंडातला जोर निघून गेलेला जाणवत आहे. बंडोबा थंडोबा झालेले स्पष्टपणे दिसत आहे. शिवसेनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठकीत फुटिरांचे नेतेपद काढून घेतलेले नाही. या मेहेरबानीची जाणीव झालेली आहे. परतीचा थोडासा दोरखंड सेनेने ठेवलेला आहे.



## आनंदी सकाळ

# देहबुद्धीचा पगडा ज्याच्यावर आहे, तो जीवात्मा !

जीवात्मा, अंतरात्मा, परमात्मा, विश्वात्मा असे चार प्रकार आहेत. देहबुद्धीचा पगडा ज्याच्यावर आहे, तो जीवात्मा. हा देहाबरोबर नष्ट होतो. आपण नेहमी असे म्हणतो, की माणसाला दोन मने असतात. त्यापैकी एक दृश्य वस्तूंशी संलग्न असून बहिर्मुख असते. लोकांत काय चांगले दिसेल व काय वाईट, याचा विचार करून ते निर्णय घेते. हा तो जीवात्मा. दुसरे मन फक्त तुमचे हित कशात आहे ते पाहूनच निर्णय घेते. तो अंतरात्मा. या अंतरात्म्याच्या अनुसंधानातच आपण राहिले पाहिजे; जेणेकरून आपली जाणीव विरल होत जाऊन त्या विश्वात्म्याशी, विश्वाच्या चालक शक्तीशी आपले अनुसंधान राहते. 'मी' आहे, ही जाणीव मला आहे, माझ्या मुलीला आहे, माझ्या आईलाही आहे. 'मी' आहे, ही जाणीव माणसाच्या जन्मापासून आहे. देह बदलतील; पण जाणीव असतेच. या अर्थाने ती अमर आहे. जळणे, तुटणे, फुटणे इत्यादी विकार देहाला होतात; जाणिवेला नाही. ती सूक्ष्म आहे.

# फुटीर आमदारांमध्ये चलबिचल, कमालीची अस्वस्थता



भूमिका



गुवाहाटीत पळून गेलेल्या फुटीर आमदारांमध्ये सध्या कमालीची अस्वस्थता आणि चलबिचल आहे. दिवस जाताहेत तसा अनेकांचा संयम सुटत चालला आहे. त्यामुळेच फुटीर गटाचे म्होरक्या असलेले एकनाथ शिंदे यांना वारंवार संयमाचे आवाहन करावे लागत आहे. मतदार संघातील वाढत्या असंतोषामुळे फुटीर आमदारांवर दबाव वाढत आहे. कुटुंबीय धास्तावलेल्या मानसिकतेत आहेत. गद्दारीचा शिक्का, पैसे खाऊन विकले गेल्याचा आरोप होत असून कुटुंबाला घराबाहेर पडणे मुश्कील झाले आहे. "आम्ही इथे काय अवस्थेत जगतोय आणि तुम्ही तिकडे मजा मारताय," असे प्रश्न कुटुंबियांकडून विचारले जात असल्याने फुटीर नेते चिंताग्रस्त झाले आहेत. काही लोकांनी स्वत:ला चौकशीच्या फेऱ्यातून वाचण्यासाठी आपली दिशाभूल केली, अर्धवट माहिती दिली, आपल्याला फसविले गेले, वापरले जात आहे, ही भावना फुटीर आमदारांमध्ये वाढत चालली आहे. मतदारसंघात वाढता विरोध, आक्रमक झालेले सर्वसामान्य शिवसैनिक, जागोजागी गद्दारीचा निषेध, विष्ठा खाल्ल्याचे आरोप, कार्यालयावर हल्ले, पुतळा दहन... त्यातच पद राहील की जाईल, हा संभ्रम. आता हे सारे नेमके केव्हा संपेल याबाबत कमालीची अनिश्चितता या सर्वांमुळे फुटीर आमदारांत याच वैफल्यातून काल रात्री गुवाहाटीत जोरदार अंतर्गत वादावादी झाल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले.

"हे सारे केव्हा संपेल," या फुटीरांच्या प्रश्नावर म्होरक्याकडे नेमके व निश्चित उत्तर नाही. "सगळे सुरळीत होईल, घाबरु नका, आपलेच सरकार येईल," या म्होरक्याच्या कोरड्या व फुसक्या उत्तरावर फुटीर आमदारांचे समाधान होत नाहीये. आता पद राहिलेच तर "प्रहार"सोबत जाऊन बसायचे का मग? हा हतबल प्रश्न फुटीर उपस्थित करीत आहेत. आपला स्वतंत्र गट आणि तीच खरी शिवसेना राहील, हे दाखवलेले स्वप्नही फुसकाट ठरताना दिसत असल्याने फुटीर आमदारांमध्ये असंतोष उफाळू लागला आहे. त्यातच महाशक्ती कुठेही नेमकेपणाने मैदानात दिसत नाही. कायदेशीर लढाई लांबतांना दिसताच महाशक्तीने हात वर केल्याच्या भावनेने फुटीर आमदार आणखी धास्तावले आहेत. त्यातील एकाने प्रश्न केला, "राज्यपालांना कोरोना लागण झाली व ते राजभवनाबाहेर गेले, तेव्हाच काहीतरी गडबड आहे, हे एव्हढे सोपे नाही हे जाणवले. तुम्ही आम्हाला सत्य का सांगत नाही. काय लपवत आहात, नेमके काय होणार आहे आमचे आता?" 48 ते 72 तासात सारे आटोपून आपले नवे सरकार महाशक्तीसह सत्तेत येईल, असे फुटीर आमदारांना आधी सांगितले गेले होते.

# गुवाहाटीच्या सहलीचे वर्तमान

**राज्यातील सत्ताबदलाच्या लढाईत सर्वाधिक प्रेक्षकसंख्या आपल्याकडे वळावी, या हेतूने दाखवल्या जाणाऱ्या अतिरंजित बातम्यांपलीकडेही प्रत्यक्ष राजकारण सुरू आहे.**

सत्तेचा हा खेळ अनेकांना किळसवाणा वाटतो; मात्र जमिनीवर राजकारण करताना अनेकदा तत्त्वांपलीकडच्या व्यावहारिक राजकारणात - ज्याला इंग्रजीत 'रियलपोलिटिक' या संज्ञेने संबोधतात - त्यात पडावेच लागते. गुवाहाटीच्या पंचतारांकित हॉटेलात एकनाथ शिंदे यांच्या छत्रीखाली किती आमदार जमले, यापेक्षा संसदीय नियम व अटींच्या जंजाळात हा खेळ कुणाच्या बाजूने किती झुकेल, यावरच राजकीय भवितव्य अवलंबून आहे. पक्षांतरबंदी कायद्यानुसार, संसदीय पक्षातील दोन तृतीयांश आमदार वा खासदारांची संख्या मूळ पक्षातून बाहेर पडण्यास तयार असल्यास, त्या फुटीला अधिकृत मान्यता मिळते, असे याबाबत भल्या भल्या राजकीय पंडितांचे मत आहे. पक्षांतरबंदी कायद्यानुसार, संसदीय पक्षातील दोन तृतीयांश आमदार वा खासदारांची संख्या मूळ पक्षातून बाहेर पडण्यास तयार असल्यास, त्या फुटीला अधिकृत मान्यता मिळते, असे याबाबत भल्या भल्या राजकीय पंडितांचे मत आहे.



घटनेच्या दहाव्या सूचीमध्ये पक्षांतराबाबत केलेल्या सविस्तर नियमांचे वाचन करून, त्या कायदेशीर भाषेचा अर्थ नीट समजून घ्यावा लागेल.

वैज्ञानिकांचा दावा, पुरुषांसाठी
फायदेशीर कपिवाचे शुद्ध शिलाजीत

सर्वोच्च न्यायालयाच्या संपूर्ण घटनापीठाने २००७मध्ये याबाबत अत्यंत महत्त्वाचा निकाल दिला. त्या निकालानुसार, संसदीय पक्ष हा संसदेत वा विधिमंडळात मूळ पक्षाचे प्रतिनिधित्व करीत असतो; त्यामुळे मूळ पक्षात दोन तृतीयांश फूट पडेल, तेव्हाच पक्षफुटीवर शिक्कामोर्तब होऊ शकते. आता शिवसेना या मूळ पक्षात फूट पाडायची असल्यास, नोंदणीकृत शिवसैनिक, शाखा प्रमुख, जिल्हा प्रमुख, विभाग प्रमुख या सगळ्यांमधील दोन तृतियांश सदस्य फुटावे लागतील. एकनाथ शिंदे यांची इतकी मोठी तयारी असती, तर त्यांना सुरुवातीला सुरतेस वा नंतर दूर गुवाहाटीत जाऊन हे खेळ करण्याची आवश्यकताच नव्हती. मूळ पक्ष ताब्यात घेण्याचा त्यांचा कितीही मानस असला, तरी ते नजिकच्या काळात तरी शक्य होईल, असे वाटत नाही. विधीमंडळाच्या नियमानुसार, मूळ पक्षाचा अध्यक्ष हाच पक्षाच्या संसदीय गटाचा नेता निवडत असतो. पक्षप्रमुखाच्या अधिकृत मान्यतेशिवाय तो निवडला जाऊ शकत नाही. निवडून आलेल्या आमदारांनी बहुमताने निवडलेला नेता हा गटनेता होत नसतो; त्यामुळे अजय चौधरी यांची केलेली निवड ही न्यायालयातही वैध ठरण्याची अधिक शक्यता आहे.

## ।। अभंगवाणी ।।



त्याचें सुख नाहीं आलें अनुभवा ।
कठिण हें जिवा तोंचिवरी ॥१॥
मागिलांचे दुख लागों नेदी अंगा ।
अंतर हें संगा नेदी पुढें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### शिवसेनेला मोठा धक्का, नरेश म्हस्के यांचा राजीनामा

। मुंबई। महाईन्यूज ।

शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले आहे. शिंदे यांच्यासोबत ४० हून अधिक आमदार असल्याने शिवसेना खिळखिळी झाली आहे. याचदरम्यान, आता ठाण्यातील शिवसेनेचे माजी महापौर नरेश म्हस्के यांनी आपल्या जिल्हाप्रमुखपदाचा राजीनामा दिला आहे. यामुळे शिवसेनेला पुन्हा मोठा धक्का बसला आहे. म्हस्के यांनी आपले हे राजीनामा पत्र शिवसेनाप्रमुख मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पाठवले आहे. शिंदे यांच्या बंडखोरीमुळे शिवसैनिक आक्रमक झाले असून शनिवारी याच रागातून संतप्त शिवसैनिकांनी महाराष्ट्रात जागोजागी शिंदे यांच्यासह बंडखोर आमदारांचे पुतळे जाळत दगडफेक केली.

## उद्धव ठाकरेंची महत्त्वाची खेळी

# कार्यकारिणी बैठकीत महत्त्वाचा ठराव एकमताने मंजूर!

## एकनाथ शिंदे गटावर मात करण्याचा प्रयत्न

। मुंबई । महाईन्यूज ।

शिवसेनेत उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे समर्थक असे उघड दोन गट पडले आहेत. एकनाथ शिंदे शिवसेनेच्या जवळपास ४० आमदारांना घेऊन आसाम राज्यातील गुवाहाटी येथे ठाण मांडून आहेत. तर दुसरीकडे उद्धव ठाकरे या आमदारांना चर्चेतून तोडगा निघू शकतो असे आवाहन करत परत बोलावत आहेत. दरम्यान, शिवसेनेने आजच्या बैठकीत काही महत्त्वपूर्ण ठराव मंजूर केले असून या ठरावांच्या माध्यमातून एकनाथ शिंदे गटावर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा समावेश असलेला नवा गट स्थापन



केल्याचे म्हटले जात असताना शिवसेनेने बाळासाहेब ठाकरे यांचे नाव कोणालाही वापरता येणार नसल्याचा ठराव आजच्या बैठकीत मंजूर करून घेतला आहे.

शिवसेनेच्या कार्यकारिणीच्या आजच्या बैठकीत एकूण सहा ठराव मंजूर करण्यात आले. या बैठकीत सध्याच्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी निर्णय घेण्याचे तसेच अंमलबजावणीचे पूर्ण अधिकार उद्धव ठाकरे यांना देण्यात आले आहेत. तसेच ठराव

शिवसेनेच्या कार्यकारिणीच्या आजच्या बैठकीत एकूण सहा ठराव मंजूर करण्यात आले. या बैठकीत सध्याच्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी निर्णय घेण्याचे तसेच अंमलबजावणीचे पूर्ण अधिकार उद्धव ठाकरे यांना देण्यात आले आहेत. तसेच ठराव क्रमांक पाचमध्ये बाळासाहेब ठाकरे यांचे नाव शिवसेना पक्षाव्यतिरिक्त इतर कोणालाही वापरता येणार नाही, असे म्हणण्यात आले आहे. "शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्यांना विलग करता येणार नाही आणि ते कोणी करुही शकत नाही.

क्रमांक पाचमध्ये बाळासाहेब ठाकरे यांचे नाव शिवसेना पक्षाव्यतिरिक्त इतर कोणालाही वापरता येणार नाही, असे म्हणण्यात आले आहे. "शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्यांना विलग करता येणार नाही आणि ते कोणी करुही शकत नाही. म्हणूनच शिवसेना पक्षाव्यतिरिक्त बाळासाहेब ठाकरे हे नाव इतर कोणालाही वापरता येणार नाही," असे या ठरावात म्हणण्यात आले असून तो एकमताने मंजूर करण्यात आला आहे.

याआधी एकनाथ शिंदे तसेच इतर बंडखोर आमदारांनी 'शिवसेना बाळासाहेब' असा नवा गट स्थापन केल्याचे वृत्त समोर आले आहे. या गटामध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे. या नावाची लवकरच एकनाथ शिंदे गटाकडून घोषणा केली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यानंतर आता शिवसेनेने बाळासाहेब ठाकरे हे नाव शिवसेनेव्यतिरिक्त कोणालाही वापरता येणार नसल्याचा ठराव मंजूर केल्यामुळे आता शिंदे गट काय निर्णय घेणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. शिंदे गटातील बंडखोर आमदार दीपक केसरकर यांनी नव्या गटाबाबत अधिक माहिती दिली आहे. "शिवसेना बाळासाहेब असं गटाचं नाव ठेवलं आहे. बाळासाहेबांच्या विचारांशी आमची बांधिलकी कायम आहे. आम्ही स्वतंत्र गट स्थापन केला आहे. आम्ही कुणामध्येही विलीन होणार नाही.


---

## एकनाथ शिंदेंच्या बंडावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे सूचक वक्तव्य

। मुंबई । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी

शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी विधान परिषद निवडणुकीनंतर केलेल्या बंडामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. शिवसेना विधिमंडळ पक्षातील बहुतांश आमदार गुवाहाटीत आल्याने आवश्यक संख्याबळ पूर्ण झाले आहे, असा दावा शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी केला आहे. त्यानंतर आता केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राज्यातील राजकीय भूकंपावर प्रतिक्रिया दिली आहे.

मला वाटते की महाराष्ट्रावरील संकट लवकरच दूर होईल. आगे आगे देखो होता है क्या. आजच्या समस्येमध्येच उद्याचे उत्तर लपलेले असते. लवकरच याबाबत सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. लवकरच परिस्थिती स्पष्ट होईल. अंधार निघून जाईल आणि सूर्य उगवेल. वैयक्तिक संबंध हे राजकाराणापेक्षा वेगळे असतात. ते सरकारमध्ये असोत किंवा नसोत संबंध तेच राहतात. राजकारण वेगळे असते,"



असे नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. यावेळी त्याचबरोबर माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे स्मरण करून ते म्हणाले की, सरकारे येतात आणि जातात, पंतप्रधान येत राहतात, पण हा देश राहिला पाहिजे. देशासाठी काम केले पाहिजे.

महाराष्ट्रावरील संकट लवकरच दूर होईल. आगे आगे देखो होता है क्या. आजच्या समस्येमध्येच उद्याचे उत्तर लपलेले असते. लवकरच याबाबत सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळतील.
लवकरच परिस्थिती स्पष्ट होईल. अंधार निघून जाईल आणि सूर्य उगवेल. वैयक्तिक संबंध हे राजकाराणापेक्षा वेगळे असतात. ते सरकारमध्ये असोत किंवा नसोत संबंध तेच राहतात. राजकारण वेगळे असते," असे नितीन गडकरी यांनी म्हटले.

### बाळासाहेबांचे माझ्यावर प्रेम होते

मी मंत्री असताना मला त्यांचे खूप सहकार्य लाभले होते. "बाळासाहेब ठाकरे होते तेव्हा त्यांच्या नेतृत्वाखाली मी काम केले आहे. त्यांचे माझ्यावर प्रेम होते. मुंबईतील विकासकामांसाठी त्यांनी मला भरपूर मदत केली होती. मी तेव्हाही त्यांचा आदर करत होतो आजही करतो. उद्धव ठाकरेंनी भाजपाला सोडून काँग्रेस, राष्ट्रवादीसोबत जाण्याचा निर्णय घेतला. काही त्यांच्या गोष्टी आहेत तर काही आमच्या. हे सुरुच राहणार आहे. भाजपा आणि शिवसेना एकत्र आली तर मला आनंद होईल. पण आज ती परिस्थिती खूप लांब असल्याचे दिसत आहे. पुढे काय आहे हे देवालाच माहिती असेल. याचे उत्तर येणारा काळच देईल, असे नितीन गडकरी म्हणाले.

## कोल्हापुरात शिवसेनेतील वाद चिघळला

। कोल्हापूर। महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी

कोल्हापूर शिवसेना अंतर्गत वाद आज (शनिवार) दुसऱ्याही दिवशी चव्हाट्यावर आला. शिवसैनिकांच्या एका गटाने कार्यालयावरील राजेश क्षीरसागर यांचे पोस्टर उतरवून ते फाडले. यावर क्षीरसागर यांनी 'मी कमजोर नाही. एकनाथ शिंदे यांचा पठ्ठा आहे,' अशा भाषेत प्रति इशारा दिला आहे. यामुळे शिवसेनेतील वाद आणखी धुमसताना दिसत आहे.

शिवसेनेचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतंत्र बाणा दाखवल्यानंतर माजी आमदार राजेश क्षीरसागर यांनी त्यांच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला आहे. तर उद्धव ठाकरे यांच्या यांचे समर्थन करण्यासाठी काल कोल्हापुरात मोर्चा निघाला, तेव्हा क्षीरसागर यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली होती.

आज माजी शिवसेना शहर प्रमुख रविकिरण इंगवले, रिक्षा चालक संघटनेचे अध्यक्ष राजू जाधव यांनी कार्यालयावरील क्षीरसागर यांचे पोस्टर काढून



### क्षीरसागर यांचा इशारा

या घटनेनंतर राज्य नियोजन मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर संतप्त झाले. त्यांनी एका चित्रफितीद्वारे इंगवले यांना उद्देशून "ते गुंड असतील तर मी सुशिक्षित गुंड आहे. मी बाहेर पडेल तेव्हा तुमची पळता भुई थोडी होईल. मी कमजोर नाही एकनाथ शिंदे यांचा पठ्ठा आहे." असा इशारा दिला आहे.

शिवसेनेचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतंत्र बाणा दाखवल्यानंतर माजी आमदार राजेश क्षीरसागर यांनी त्यांच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला आहे. तर उद्धव ठाकरे यांच्या यांचे समर्थन करण्यासाठी काल कोल्हापुरात मोर्चा निघाला, तेव्हा क्षीरसागर यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली होती.

फाडायला लावले. " शिवसेना अंगार है बाकी सब भंगार है" अशा घोषणा दिल्या. तसेच, "शिवसेनेशी गद्दारी केली. पक्षाच्या नावावर जोगवा मागून मंत्री पदाचा दर्जा मिळवला. शिवसेनेने सारेकाही वैभव देऊनही बकासुर राक्षस सारखी भूक असणाऱ्या राजेश क्षीरसागरची अहंकार जिरवू. शिवसेनेच्या नावावर गब्बर झालेल्या पिता-पुत्रांना धडा शिकवू.", अशी टीकाही यावेळी इंगवले यांनी केली.

## शॉर्ट न्यूज »

### “तुमच्यावर ईडीचा दबाव आहे का?”

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवसेनेचे दिग्गज नेते एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक आमदारांनी अचानक बंड केल्याने त्याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. माध्यमांसमोर बंडखोर आमदार हिंदुत्वाचा मुद्दा मांडत असले, तरी बंड करण्यामागे ईडीसारख्या केंद्रीय तपास संस्थाच्या कारवाईची भीती असल्याचाही आरोप केला जातोय. याबाबत बंडखोर आमदारांचे नेते दीपक केसरकर यांना विचारण्यात आला. यावेळी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते गुवाहटीमधून ऑनलाईन पद्धतीने घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. दीपक केसरकर म्हणाले, “२-३ आमदारांवर ईडीचा दबाव असेल, पण बाकीची शेतकऱ्यांची पोरं आहेत. त्यांना भेटच न मिळाल्यामुळे दरी निर्माण झाली. या आमदारांना एकमेव भेटणारा नेता म्हणजे एकनाथ शिंदे होते. त्याचं प्रेम वाढलं आणि त्यामुळं हे झालं. आम्ही उद्धव ठाकरेंना सांगत होतं की, तुम्ही भाजपासोबत सरकार बनवा. भाजपासोबत निवडणूक लढवली आहे, मग त्यांच्यासोबत सरकार बनवायला काय हरकत आहे.”

# गुजरात दंगलीला नेहमीच राजकीय नजरेतून पाहिले गेले

## मी मोदींचे दुःख जवळून पाहिले – अमित शाह

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

गुजरात दंगलीवर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर गृहमंत्री अमित शाह यांनी एएनआय या वृतसंस्थेला विशेष मुलाखत दिली. या मुलाखतीत गुजरात दंगली प्रकरणात मोदींवर केलेले सर्व आरोप सर्वोच्च न्यायालयाने सर्व आरोप फेटाळून लावल्याचे गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले आहे. 2002 मध्ये झालेल्या या गुजरात दंगलीबाबत अनेक मोठे खुलासे अमित शाह यांनी केले. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींना मिळालेल्या क्लीन चीटवर समाधान व्यक्त केले आहे. गुजरात दंगली नेहमीच राजकीय नजरेतून पाहिल्या गेले, मात्र सत्य सोन्यासारखे बाहेर आले आहे. या वेळच्या पंतप्रधान मोदींच्या वेदना मी जवळून पाहिल्या आहेत, असं अमित शाह म्हणाले. पंतप्रधान



> 2002 मध्ये झालेल्या या गुजरात दंगलीबाबत अनेक मोठे खुलासे अमित शाह यांनी केले. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींना मिळालेल्या क्लीन चीटवर समाधान व्यक्त केले आहे. गुजरात दंगली नेहमीच राजकीय नजरेतून पाहिल्या गेले, मात्र सत्य सोन्यासारखे बाहेर आले आहे.

मोदींवर खोटे आरोप करण्यात आले. ज्यांनी हे केले त्यांनी आता माफी मागावी. कारण मोदीजींनी नेहमीच कायद्याचे समर्थन केले, अशी मागणीही अमित शाहांनी केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, १८ ते १९ वर्षांची लढाई देशाचा एवढा मोठा नेता एक शब्दही न काढता दुःख भगवान शंकराच्या विषाप्रमाणे गिळू लढत राहिला आणि आज अखेर जेव्हा सत्य सोन्यासारखे चमकून बाहेर आले. म्हणून आनंद होत आहे. न्यायिक प्रक्रिया सुरु असल्याने मोदीजींना या वेदनांना तोंड देताना मी जवळून पाहिले आहे. त्यामुळे सर्वकाही खरे असूनही काहीही बोलणार आहे. मनाने खूप मजबूत ही भूमिका फक्त हा माणूसच घेऊ शकतो.

दंगलीवरील आरोप फेटाळताना अमित शाह म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने सर्व आरोप फेटाळले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने हे सिद्ध झाले आहे की, सर्व आरोप राजकीय हेतूने प्रेरित होते. न्यायालयाने निर्णय दिला की, सरकारने शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले.

# “हा तर गोडसेच्या तोंडी महात्मा गांधींचा जयजयकार करण्याचा प्रकार”

## राष्ट्रपती राजवटीची मागणी





। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यात शिवसेनेमध्ये उघड उघड दोन शिवसेना पक्षात उघड उघड दोन गट पडल्यामुळे राज्यात मोटा सत्तापेच निर्माण झाला आहे. मंत्री एकनाथ शिंदे शिवसेनेचा दुसरा गट स्थापन करण्याच्या तयारीत असून त्यांना काँग्रेस आणि राष्ट्रवादी या पक्षांसोबत सत्तेत वाटा नको आहे. तर दुसरीकडे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिंदे तसेच बंडखोर आमदारांवर कठोर कारवाईची भाषा केली आहे. या सर्व घडामोडी घडत असताना खासदार नवनीत राणा यांनी राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी मागणी केली आहे. त्यांच्या याच मागणीला राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी सणसणीत उत्तर दिले असून राणा यांच्या तोंडी संविधानाची भाषा म्हणजे नथुराम गोडसेच्या तोंडी महात्मा गांधी यांचा जयजयकार करण्याचा प्रकार आहे, अशी प्रतिक्रिया दिली आहे. एबीपी माझाशी ते बोलत होते.“नवणीत राणा आणि संविधानाचा काय संबंध आला? मातोश्रीवर जाऊन हनुमान चालिसा म्हणण्याचा अट्टहास करणाऱ्या रवी राणा आणि नवणीत राणा यांना संविधान कधीपासून कळायला लागलं? संविधानाचा खून करणारी ही लोकं आहेत. संविधानावर त्यांनी बोलू नये. संविधान अनुच्छेद दोन आणि चारनुसारच भारतीय जनता पार्टीचं सरकार बनू शकत नाही. इथे फ्लोअर टेस्ट करावी लागेल. इथे संविधानाने तुमच्यामध्ये आडकाठी आणली आहे,” अशी घणाघाती टीका राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी खासदार नवनीत राणा यांच्यावर केली.

# NIA च्या प्रमुख पदी दिनकर गुप्ता यांची नियुक्ती

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

वरिष्ठ भारतीय पोलीस सेवा (IPS) अधिकारी दिनकर यांची यांची गुरुवारी राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) महासंचालकपदी नियुक्ती करण्यात आली. केंद्रीय मंत्रालयाने यासंदर्भातील आदेश जारी केला आहे. गुप्ता हे पंजाब केडरचे 1987 च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने गुप्ता यांची NIA चे महासंचालक म्हणून 31 मार्च 2024 पर्यंत म्हणजेच त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपर्यंत नियुक्तीला मान्यता दिली आहे. अन्य एका आदेशात असे सांगण्यात आले की, स्वागत दास यांची गृह मंत्रालयात विशेष सचिव (अंतर्गत सुरक्षा)



म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सीआरपीएफचे महासंचालक गेल्या मे महिन्यापासून एनआयएचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत होते. मात्र याता पदाची जबाबदारी वरिष्ठ भारतीय पोलीस सेवा (IPS) अधिकारी दिनकर यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

पोलिस प्रशासनात पदव्युत्तर पदवी घेतलेल्या गुप्ता यांनी 2019 मध्ये पंजाब पोलिस महासंचालक म्हणून पदभार स्वीकारला. दोन वर्षे सात महिने या पदाचं कामकाज त्यांनी सांभाळले.

याशिवाय त्यांनी पंजाबमध्ये डीजीपी इंटेलिजन्सचे पदही भूषवले. केंद्रीय प्रतिनियुक्तीसाठी परवानगी मागितल्याने त्यांची पंजाब पोलीस गृहनिर्माण मंडळाचे अध्यक्ष म्हणून बदली करण्यात आली.

तसेच त्यांनी पंजाबमधील लुधियाना, जालंधर आणि होशियारपूर जिल्ह्यांचे एसएसपी पद भूषवले होते, या काळात संबंधित जिल्ह्यांमध्ये दहशतवाद ही एक मोठी समस्या म्हणून उदयास येत होती.

दिनकर गुप्ता यांनी यापूर्वी जून 2004 ते जुलै 2012 या कालावधीत केंद्रीय प्रतिनियुक्तीवर आठ वर्षे काम पाहिले. यावेळी त्यांनी व्हीव्हीआयपींची सुरक्षा पाहणाऱ्या इंटेलिजन्स ब्युरोच्या प्रमुखाची जबाबदारी स्वीकारली. पोलीस दलातील विशेष सेवेसाठी दिनकर गुप्ता यांना 1992 आणि 1994 मध्ये दोन पोलीस शौर्य पदके देण्यात आली.

याशिवाय राष्ट्रपतींच्या हस्ते गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदक आणि विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रीय पोलीस पदक (2010) देखील प्रदान करण्यात आले आहे.

1999 मध्ये दिनकर गुप्ता यांना ब्रिटिश कौन्सिलने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये ब्रिटीश चेवनिंग गुरुकुल शिष्यवृत्ती प्रदान केली.

### चन्नी सरकारच्या काळात डीजीपी पदावरुन हटवले

पंजाबमध्ये कॅप्टन अमरिंदर सिंग यांच्या राजीनाम्यानंतर मुख्यमंत्री बनलेल्या चरणजीत सिंग चन्नी यांनी दिनकर गुप्ता यांच्या जागी 1988 च्या बॅचचे अधिकारी इक्बाल प्रीत सिंग सहोता यांच्याकडे डीजीपीची जबाबदारी सोपवली. चन्नी मुख्यमंत्री होताच गुप्ता यांनी महिनाभराच्या रजेवर जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा हा प्रकार घडला.

### पत्नीच्या हाताखालीही केले काम

पंजाबमध्ये डीजीपी म्हणून काम करताना, दिनकर गुप्ता यांनी त्यांच्या पत्नी विनी महाजन यांच्या हाताखालीही काम केले. कॅप्टन अमरिंदर सिंग यांच्या सरकारने राज्याच्या मुख्य सचिवपदी विनी महाजन यांची नियुक्ती केली होती. हाही तो काळ होता जेव्हा पंजाबच्या महत्त्वाच्या पदांच्या जबाबदाऱ्या पती-पत्नी दोघांच्याही खांद्यावर होत्या. त्यामुळे दिनकर गुप्ता यांना त्यांच्या पत्नी मुख्य सचिव विनी महाजन यांच्या हाताखाली काम करावे लागले. विनी महाजन याही दिनकर गुप्ता यांच्याप्रमाणेच 1987 च्या बॅचच्या आयएएस अधिकारी आहेत. मुख्यमंत्री चरणजित सिंह चन्नी यांनी त्यांना मुख्य सचिव पदावरून हटवले.

# रणबीर कपूरच्या 'शमशेरा'मध्ये झळकणार

स्टार प्रवाह या टेलिव्हिजनवाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'सुख म्हणजे नक्की काय असतं' गेल्या अनेक दिवसांपासून प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहे. या मालिकेतील गौरी आणि जयदीपची जोडीचे अनेक चाहते सुद्धा आहेत. शिवाय या दोघांव्यतिरिक्त या मालिकेतील प्रत्येक पात्राने आपली जागा निर्माण केली आहे. वर्षा उसगावकर आणि सुनील गोडसे या दोन ज्येष्ठ कलाकारांनी मालिकेची शोभा वाढवली आहे. सुनील गोडसे यांनी मालिकेत जयदीपच्या वडीलांची भूमिका साकारली आहे. दादासाहेब शिर्केपाटील हे त्यांच्या भूमिकेचे नाव असून प्रेक्षकांकडून या त्यांच्या या भूमिकेचे खूप कौतुक होत असते. दरम्यान सुनील गोडसे रणबीर कपूरच्या 'शमशेरा' चित्रपटात दिसून येणार आहेत.



सुनील गोडसे यांनी शमशेरा शिवाय सिंबा, हायजॅक, काबूल एक्सप्रेस या चित्रपटांमध्ये काम केले आहे. याशिवाय त्यांनी वादळवाट, राजा शिवछत्रपती, पवित्र रिश्ता यांसारख्या बऱ्याच मालिकेत काम केले आहे.नुकताच या चित्रपटाचे ट्रेलर रिलीज करण्यात आले .

# "तू ज्या कलाकृतीत असते ती हिट का होते?"

मराठमोळी अभिनेत्री प्राजक्ता माळी ही लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. प्राजक्ताने आतापर्यंत अनेक मालिकांमध्ये काम केले आहे. प्राजक्ता ही 'जुळून येती रेशीमगाठी', 'नकटीच्या लग्नाला यायचं हं' यांसारख्या प्रसिद्ध मालिकेतून घराघरात पोहोचली. प्राजक्ताने अभिनयाच्या जोरावर प्रत्येक प्रेक्षकाच्या मनात एक वेगळे स्थान निर्माण केलं आहे. सध्या प्राजक्ता ही महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करताना दिसते. गेल्या काही दिवसांपासून ती रानबाजार या वेबसीरिजमुळे चर्चेत आहे. त्यासोबत ती



लवकरच वाय चित्रपटात झळकणार आहे. नुकतंच तिचे एका मुलाखतीत प्राजक्ता माळीने तिच्या कलाकृती हिट होण्यामागचे कारण सांगितले आहे. प्राजक्ता माळी ही वाय चित्रपटाच्या अनोख्या टिझर आणि ट्रेलरमुळे चांगलीच चर्चेत आहे. या चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान तिने एक मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने केलेलं एक वक्तव्य चांगलेच चर्चेत आहे. 'प्राजक्ता ज्या ज्या कलाकृतीत असते ती कलाकृती हिट होते.'

# "मला अद्याप थकीत मानधन मिळालेले नाही", 'तारक मेहता...' मधील अंजली भाभीचे निर्मात्यांवर गंभीर आरोप

छोट्या पडद्यावरील अतिशय लोकप्रिय मालिकांच्या यादीमधील एक नाव म्हणजे 'तारक मेहता का उल्टा चष्मा.' या मालिकेतील प्रत्येक कलाकाराने प्रेक्षकांच्या मनात घर गेले आहे. या मालिकेतील जेठालाल आणि दयाबेन ही जोडी तर घराघरात प्रसिद्ध ठरली. या मालिकेत तारक मेहताची पत्नी अंजली भाभी ही कायमच चर्चेत असते. या मालिकेत अंजली भाभी हे पात्र अभिनेत्री नेहा मेहताने साकारले होते. मात्र काही वर्षांपूर्वी नेहाने ही मालिका सोडली. दरम्यान मालिका सोडल्यानंतर तब्बल २ वर्षांनी नेहाने निर्मात्यांवर गंभीर आरोप केले आहेत.

अंजली भाभीची भूमिका साकारणाऱ्या नेहाने २०२० मध्ये मालिका सोडण्याचा निर्णय घेतला. तिने तब्बल १२ वर्षे या मालिकेत काम केले.



नेहाच्या मालिका सोडण्याच्या निर्णयामुळे तिच्या चाहत्यांना धक्का बसला. यानंतर आता तब्बल २ वर्षांनी नेहाने मालिकेबद्दल गंभीर आरोप केले आहेत. ती म्हणाली, "मी २०२० मध्ये मालिका सोडली होती. हा शो माझ्या कुटुंबाचा एक भाग बनला होता. त्यामुळे मी काहीही न बोलता तो शो सोडणे योग्य समजले.

# 'वेड' या मराठी चित्रपटात अशोक सराफ आणि जिनिलियासोबत झळकणार सलमान

याआधी सलमान खानने रितेश देशमुखच्या 'लय भारी' या चित्रपटात काम केले होते. बॉलिवूडचा भाईजान सलमान खान हा लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. सलमानचं मराठीवर असलेलं प्रेम हे सगळ्यांनाच माहित आहे. सलमानने या पूर्वी अभिनेता रितेश देशमुखच्या 'लय भारी' या चित्रपटात काम केले होते. त्यानंतर आता तो पुन्हा एकदा एका मराठी चित्रपटात काम करताना दिसणार आहे. एवढंच काय तर या चित्रपटात अभिनेता अशोक सराफ आणि जिनिलिया देशमुख मुख्य भूमिकेत दिसणार आहे. अशोक सराफ आणि जिनिलियाच्या या चित्रपटाचे दिग्दर्शन रितेशने केले आहे. अभिनय क्षेत्रात कारकीर्द गाजवल्यानंतर रितेशने आता दिग्दर्शनात पदार्पण करण्याचा निर्णय घेतला आहे. या मराठी चित्रपटाचे नाव 'वेड' असे आहे. याच चित्रपटात सलमान एका गाण्यात दिसणार आहे. तर या गाण्याचं चित्रीकरण लवकरच सुरु होणार आहे. या चित्रपटातून जिनिलिया मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करणार आहे. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचं पोस्टर प्रदर्शित झालं होतं. जिनिलियासह अभिनेत्री जिया



शंकरदेखील या सिनेमात प्रमुख भूमिकेत आहे. प्रसिद्ध संगीतकार अजय-अतुल यांनी सिनेमातील गाण्यांना संगीत दिलं आहे. दरम्यान, या शिवाय सलमान शाहरुख खानच्या पठान या चित्रपटात दिसणार आहे. सध्या तो 'कभी ईद कभी दिवाली' या चित्रपटाच्या शूटिंगसाठी हैदराबादमध्ये आहे.

# मिका सिंगच्या स्वयंवरमध्ये मराठमोळ्या विनोदी कलाकाराची मुलगी होणार सहभागी




सुप्रसिद्ध गायक मिका सिंगच्या गाण्याचे लाखो चाहते आहेत. त्याने आजवर अनेक सुपरहिट गाणी बॉलिवूडला दिली. त्याची गाणी अगदी थिरकायला लावणारी असतात. आपल्या कामामुळे मिका हा सतत चर्चेत असतो. त्याशिवाय मिकाचं खाजगी आयुष्य देखील नेहमीच चर्चेत असते. लवकरच मिका सिंग हा विवाहबंधनात अडकणार आहे. स्टार भारत या वाहिनीवर 'स्वयंवर मिका दी वोटी' नव्या रिॲलिटी शो सुरु झाला आहे. या स्वयंवरमध्ये १२ जणी सहभागी होणार आहेत. 'स्वयंवर मिका दी वोटी' या कार्यक्रमात एका मराठमोळ्या अभिनेत्याची मुलगी देखील सहभागी होणार आहे. त्यामुळे त्याच्या स्वंयवरची जोरदार चर्चा रंगली आहे.

मिका सिंगच्या स्वयंवरसाठी तब्बल १२ जणी सहभागी घेतला आहे. त्यात एका मराठी विनोदी कलाकाराच्या मुलीनेही सहभाग घेतला आहे. ध्वनी पवार असे या स्पर्धकाचे नाव आहे. ती 'स्वयंवर मिका दी वोटी' या कार्यक्रमात सहभागी होणार आहे. ध्वनी पवार ही व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट आहे. ध्वनीने काही शोचे सूत्रसंचालन केले आहे. तिला गाण्याची देखील उत्तम जाण आहे. ध्वनीने अनेक ॲनिमेशन शोसाठी तिने व्हॉइस ओव्हर आर्टिस्टचे काम केले आहे. 'बळी' या मराठी चित्रपटाच्या प्रमोशनसाठी ध्वनीने 'चला हवा येऊ द्या' मंचावरही उपस्थित दर्शवली होती.

## शॉर्ट न्यूज »

### विश्वचषक तिरंदाजी स्पर्धा : अभिषेक-ज्योती जोडीला सुवर्ण

पॅरिस । महाईन्यूज

अभिषेक वर्मा आणि ज्योती सुरेखा वेन्नम या भारतीय जोडीने शनिवारी विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेच्या तिसऱ्या टप्प्यातील कंपाऊंड प्रकाराच्या मिश्र सांघिक गटात सुवर्णपदक पटकावले. अभिषेक-ज्योती या आघाडीच्या जोडीने फ्रान्सच्या जिन बोल्च आणि ४८ वर्षीय ऑलिम्पिक पदकविजेती सोफी डोडमोंट या फ्रेंच जोडीला अंतिम लढतीत १५२-१४९ असे नमवले. यासह त्यांनी भारताला कंपाऊंड मिश्र सांघिक गटातील पहिलेवहिले सुवर्णपदक मिळवून दिले. भारताची सर्वात यशस्वी कंपाऊंड जोडी असलेल्या अभिषेक आणि ज्योतीने गेल्या वर्षीच्या विश्वचषक स्पर्धेत रौप्यपदक कमावले होते. त्यांनी यंदा सुवर्णपदक पटकावत भारताला या स्पर्धेतील एकूण दुसरे पदक मिळवून दिले आहे. दीपिका कुमारी, अंकिता भाकट आणि सिमरनजीत कौर या भारतीय त्रिकुटाने यापूर्वीच महिलांच्या रीकर्व्ह सांघिक गटाची अंतिम फेरी गाठत आपले पदक निश्चित केले आहे.

### भारत-श्रीलंका ट्वेन्टी-20 मालिका

# भारताला आघाडीच्या फलंदाजीच्या फळीची चिंता

### श्रीलंकेविरुद्ध दुसऱ्या ट्वेन्टी-20 सामन्यासह मालिका विजयाचा निर्धार

।डाम्बुला । महाईन्यूज ।

मालिका विजयासाठी प्रयत्नशील असलेल्या भारतीय महिला क्रिकेट संघाला शनिवारी दुसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात श्रीलंकेचा सामना करण्यासाठी आघाडीच्या फलंदाजी फळीच्या कामगिरीत सुधारणा करावी लागणार आहे. भारताने गुरुवारी पहिल्या ट्वेन्टी-२० सामन्यात ३४ धावांनी विजय मिळवत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. मालिका जिंकण्यासाठी कमकुवत दुव्यांवर मेहनत घेण्याचा भारताचा प्रयत्न असेल. आगामी बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ट्वेन्टी-२० महिला क्रिकेटचा समावेश करण्यात आला असून या मालिकेच्या माध्यमातून भारताला उत्तम सराव मिळणार आहे.



गुरुवारी पहिल्या ट्वेन्टी-२० सामन्यात ३४ धावांनी विजय मिळवत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. मालिका जिंकण्यासाठी कमकुवत दुव्यांवर मेहनत घेण्याचा भारताचा प्रयत्न असेल. आगामी बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ट्वेन्टी-२० महिला क्रिकेटचा समावेश करण्यात आला असून या मालिकेच्या माध्यमातून भारताला उत्तम सराव मिळणार आहे.

भारताने पहिला सामना जिंकला असला, तरीही फलंदाजांना यामध्ये चमक दाखवता आली नाही. शफाली वर्मा (२२ धावा), कर्णधार हरमनप्रीत कौर (२२ धावा) आणि रिचा घोष (११ धावा) यांना चांगल्या सुरुवातीचे मोठ्या खेळीत रूपांतर करता आले नाही. मितालीचा विक्रम मोडीत काढण्यासाठी हरमनप्रीतला २४ धावांची आवश्यकता आहे. उपकर्णधार स्मृती मानधना आणि एस. मेघना यांच्याकडून या लढतीत उत्तम खेळीची अपेक्षा असणार आहे.

गोलंदाजांनी भारताच्या मागील विजयात महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. राधा (२/२२), दीप्ती (१/९) आणि शफाली (१/१०) या फिरकीपटूंनी धिम्या खेळपट्टीवर चमक दाखवली होती. यजमान संघाला त्यांच्या चमारी अटापट्टू, विश्मी गुणरत्ने, हर्षिता मडवी व नीलाक्षी डीसिल्वा यांच्याकडून मोठ्या खेळीची अपेक्षा असेल.

### रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा

# मुंबईची पकड ढिली!

।पीटीआय । महाईन्यूज ।

यश दुबे आणि शुभम शर्मा यांच्या अनपेक्षित आणि चिवट शतकांमुळे देशांतर्गत क्रिकेटमध्ये महासत्ता मानल्या जाणाऱ्या मुंबईची रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या जेतेपदावरील पकड ढिली झाली. मध्य प्रदेशने शुक्रवारी पहिल्यावहिल्या रणजी जेतेपदाच्या दिशेने सकारात्मक आगेकूच केली आहे.

दुसऱ्या दिवसअखेर मुंबईची पहिल्या डावातील ३७४ धावसंख्या समाधानकारक वाटत होती. पण तिसऱ्या दिवशी मध्य प्रदेशने ३ बाद ३६८ अशी भक्कम मजल मारत हे अंदाज चुकीचे ठरवले. दुबे (३३६ चेंडूंत १३३ धावा) आणि शर्मा (२१५ चेंडूंत ११६ धावा) यांनी दुसऱ्या गड्यासाठी २२२ धावांची भागीदारी करीत मध्य प्रदेशच्या धावसंख्येने महत्त्वाची भूमिका बजावली. मध्य प्रदेशला पहिल्या डावातील निर्णायक आघाडी घेण्यासाठी आता फक्त सात धावांची आवश्यकता आहे. त्यामुळे चौथ्या दिवशी मध्य प्रदेशचा पहिला डाव लवकर गुंडाळून उर्वरित दोन दिवसांत सामना निकाली ठरवण्यासाठी



मुंबईला प्रयत्न करावे लागतील. अन्यथा, मध्य प्रदेशने जेतेपदावरील दावेदारी मजबूत केली आहे. पहिला डाव शक्य होईल तितका लांबवून मुंबईला पुनरागमनाची कोणतीही संधी न देण्याची मध्य प्रदेशची योजना आहे. याआधी १९९८-९९मध्ये मध्य प्रदेशचा अंतिम फेरीत पोहोचला होता. त्या वेळी कर्नाटककडून पराभवामुळे मध्य प्रदेशला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. चंद्रकांत पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली दुबे-शर्मा जोडीने मुंबईच्या गोलंदाजीपुढे 'खडूस' फलंदाजीचा प्रत्यय घडवला. शुक्रवारी संपूर्ण दिवसात मध्य प्रदेशने फक्त २४५ धावा केल्या. पण कुशल रणनीतीमुळे गोलंदाजांना अखेपर्यंत झगडायला लावले. एम. चिन्नास्वामी स्टेडियमच्या खेळपट्टीकडून मुंबईच्या गोलंदाजांना कोणतीही साथ मिळाली नाही.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही